अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७८/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/६७७५ दि.१९ /९/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७८/२०२४

श्री.देवेंद्र राजेंद्र राऊत
मंजुषा सोसायटी, ७-अ
विकास नगर, होडगी रोड,
सोलापूर-४१३००३

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.देवेंद्र राजेंद्र राऊत, मंजुषा सोसायटी, ७-अ, विकास नगर, होडगी रोड, सोलापूर-४१३००३ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/७/२०२४ (आ.क्र.७२६९, दि.२९/७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४६८४, दि.२/८/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २७/७/२०२४ | २९/७/२०२४ | २८/८/२०२४ | २/८/२०२४ | ० |

आरोग्य निरिक्षक पदासाठी पात्र असलेले उमेदवारांचे शैक्षणिक व अनुभव दाखले मिळावेत. खुल्या प्रवर्गातील किती उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती

दिली का? पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली असल्यास कागदपत्र देण्याची कार्यवाही चाले आहे. मी स्वत: पात्र असताना पडताळणीसाठी का बोलावले नाही. नियुक्ती दिली आहे का? याबाबत खुलासा मिळावा, असे नमूद करुन दि.१४/८/२०२४ रोजी (आ.क्र.८९८५ दि.१९/८/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १४/८/२०२४ | १९/८/२०२४ | १/९/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.९/९/२०२४ रोजी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/६४०४, दि.५/९/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणी प्रथम दि.३/९/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती मात्र अपिलार्थी ऑनलाईन सुनावणीस उपस्थित न राहिल्याने दि.९/९/२०२४ रोजी पुन्हा सुनावणी ऑनलाईन आयोजित करण्यात आली आहे. ऑनलाईन सुनावणी दरम्यान तांत्रिक अडचणीमुळे अपिलार्थी उपस्थित होवू शकले नाही. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते .

## विवेचन

आरोग्य निरिक्षक पदासाठी पात्र असलेले उमेदवारांचे शैक्षणिक व अनुभव दाखले मिळावेत. खुल्या प्रवर्गातील किती उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली का? पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली असल्यास कागदपत्र देण्याची कार्यवाही चाले आहे. मी स्वत: पात्र असताना पडताळणीसाठी का बोलावले नाही. नियुक्ती दिली आहे का? याबाबत खुलासा मिळावा, असे नमूद करुन दि.१४/८/२०२४ रोजी (आ.क्र.८९८५ दि.१९/८/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/७/२०२४ (आ.क्र.७२६९ दि.२९/७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. स्वच्छता निरिक्षक पदासाठी कागदपत्रे पडताळणी करुन पात्र झालेल्या उमेदवारांचे शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्रे चे कागदपत्रे मिळावे तसेच खुल्यास प्रवर्गातील किती गुण असलेले उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले होते आणिक उमेदवारांना नियुक्ती दिली आहे का? इ.माहिती आवश्यक आहे याबाबत माहिती अधिकार अर्जात मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४६८४ दि.२/८/२०२४ रोजी माहिती कलम ८(१)(ञ) अन्वये माहिती उपलब्ध करुन देणे अडचणीचे असल्याबाबत नमूद करुन माहिती नाकारण्यात आली आहे.

ऑनलाईन सुनावणी होवू शकली नसल्याने अपिलार्थी यांना दि.१०/९/२०२४ रोजी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला असता, पात्र-अपात्र उमेद्वारांच्या यादीनुसार मला नियुक्ती प्राप्त नसल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले.

भरतीबाबतचे सदर प्रकरण कार्यवाहीत असल्याने माहिती नाकारली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

आरोग्य निरिक्षक भरतीबाबतची प्रक्रिया अर्ज प्राप्तीचे वेळी कार्यवाहीत असल्याने माहिती नाकारण्यात आली आहे. सदर प्रकरणावर दि.२२/८/२०२४ कार्यवाही पूर्ण होवून नियुक्ती आदेश प्रसिद्ध झाले आहेत. सबब, जन माहिती अधिकारी यांनी सार्वजनिक स्वरुपातील अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावेत असे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांनी मूळ अर्जातील सार्वजनिक स्वरुपाचे अभिलेखे शुल्क आकारुन आदेश प्राप्तीपासून १५ दिवसात अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७८/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
11-9-24.

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.